नवप्रभा
रविवार, दि. १९ जुलै २०१५

# परिश्रमामुळेच जीवनात यश : नाईक

दोडामार्ग (न. वा.)

आज स्पर्धा खूप आहे या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी बिनधास्तपणे बोलले पाहिजे, पुढे येऊन आपल्या अंगातील कला उत्तमप्रकारे सादर केले पाहिजे. यात नावलौकिक मिळविण्यासाठी तुमच्या जवळ प्रबळ इच्छाशक्ती, आत्मविश्वास, प्रचंड परिश्रम, सातत्य आणि मार्गदर्शनाची गरज असते. ते असल्याशिवाय यश मिळत नाही, असे उद्‌गार मुंबई विद्यापीठाच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. आशिष नाईक यांनी काढले. ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळवे महाविद्यालयात आयोजित केलेल्या मुंबई विद्यापीठाच्या ४८ व्या युवा महोत्सव मार्गदर्शन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी भाई परमेकर, मार्गदर्शक आर. वाय. पाटील व प्राध्यापक वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी होते.

दरवर्षी विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी मुंबई विद्यापीठ, युवा महोत्सवाचे आयोजन करते. यामध्ये एकूण ३२ कला प्रकार आहेत. यात नृत्य, वादन, गायन, नाट्य, पारंपरिक नाट्यांचाही समावेश केला जातो.